स्थानिक स्तरावरील नळयोजनांस प्रशासकीय
मान्यता देण्यासाठी आर्थिक मर्यादा
जिल्हा परिषदांना प्रदान करण्यात आलेली

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**परिपत्रक क्र.ग्रापापु-१०९८/प्र.क्र.२०४/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- ३० सप्टेंबर, १९९८**

**संदर्भ :-**

१. शासन आदेश, ग्राम विकास विभाग क्रमांक ग्रापापु-१०९०/सीआर-७८/३९ अ, दिनांक २३ मे, १९९०
२. शासन पत्र, ग्राम विकास विभाग क्रमांक ग्रापापु-१०९०/सीआर-१७६/३९ अ, दिनांक २२ जानेवारी, १९९१
३. शासन पत्र, ग्राम विकास विभाग क्रमांक ग्रापापु-१०९१/सीआर-१७९/३९ अ, दिनांक ४ फेब्रुवारी, १९९१
४. शासन अधिसूचना, ग्राम विकास विभाग क्रमांक ग्रापापु-१०९२/सीआर-३७८/३९ अ, दिनांक २० मे, १९९२
५. शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक ग्रापापु-१०९३/ सीआर-६३५/३९ अ, दिनांक २१ फेब्रुवारी, १९९४
६. शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक ग्रापापु-१०९५/सीआर-९९२/३९ अ, दिनांक २९ मार्च, १९९५
७. शासन अधिसूचना, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक झेडपीई-१०९६/प्र.क्र.२१०/ ०५, दिनांक ७ डिसेंबर, १९९६

**परिपत्रक :-**

संदर्भांकित अ.क्र. (१) ते (६) वरील आदेश अधिक्रमिती करण्यात येत आहेत.

२. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत शासनाने विहीत केलेल्या निकषानुसार पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने ज्या समस्याग्रस्त गांवे/वाडयामधून पिण्याच्या पाण्याच्या योजना राबवावयाच्या आहेत अशा गावे/वाडया हया जिल्हा पाणी पुरवठा समितीने मंजूर केलेल्या वार्षिक कृती आराखडयात समाविष्ट असल्यास व उक्त प्रकारच्या गांवे/वाडयांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी नळ योजना घेण्याची शिफारस जिल्हा पाणी पुरवठा समितीने केल्यास, शासनाने नळ योजनांसाठी विहीत केलेल्या अन्य मापदंड/निकषांच्या आधीन राहून,

अशा गांवे/वाडयांसाठी तयार करण्यात आलेल्या रु.१५.०० लक्ष (रुपये पंधरा लक्ष फक्त) खर्चापर्यंतच्या नळ योजनांस प्रशासकीय मान्यता देण्यास जिल्हा परिषदा सक्षम राहतील असे शासनाचे आदेश आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

**(रु. न. देशमुख)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, (सर्व)
२. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई
५. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
६. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
७. कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
८. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
९. उप अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता)
११. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१२. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१३. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१४. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
१५. वित्त विभाग (व्यय-३, अर्थसंकल्प-१६)
१६. ग्राम विकास व जल संधारण विभाग (जल-२ व जल-४ कार्यासन क्र२५ व २७)
१७. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासन अधिकारी
१८. निवडनस्ती (पापु-०७)